राजपत्रित अधिकाऱ्यांसाठी व अराजपत्रित कर्मचाऱ्यांसाठी मराठी भाषा परीक्षा.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-मभाप-१०९२/१५७०/(प्र.क्र.१४३/९२)/२०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- 1 JAN 1993

वाचा :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दिनांक ३०.१२.८७.

निर्णय :- शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.मभाप-१०८७/१४/सीआर-२/८७/२०, दिनांक ३१.१२.८७ अन्वये अनुक्रमे राजपत्रित अधिकारी व अराजपत्रित कर्मचारी यांच्यासाठी मराठी भाषा परीक्षा नियम विहित करण्यात आले असून या नियमानुसार शासनाच्या राजपत्रित अधिकाऱ्यांना हे नियम अंमलात येण्याची तारीख किंवा त्यांच्या नेमणुकीची तारीख यापैकी जो नंतरची असेल त्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी निम्नस्तर परीक्षा आणि निम्नस्तर परीक्षा उत्तीर्ण झाल्यापासून दोन वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वी उच्चस्तर परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. जे राजपत्रित अधिकारी/अराजपत्रित कर्मचारी विद्यमान नियमानुसार मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा अनुक्रमे दिनांक ३०.१२.१९८९ व दि.३०.१२.९१ पर्यंत उत्तीर्ण झालेले नाहीत अथवा मराठी भाषा परीक्षेच्या नियमावलीनुसार सूट मिळण्यास पात्र नाहीत त्यांच्या अनुक्रमे दि.३०.१२.८९ व दि.३०.१२.९१ नंतर देय असलेल्या वेतनवाढी रोखणे आवश्यक होते. परंतु काही मंत्रालयीन विभागातील व त्यांच्या नियंत्रणाखालील दुय्यम कार्यालयातील जे अधिकारी व कर्मचारी मराठीच्या विहित परीक्षा दि.३०.१२.८९ व दि.३०.१२.९१ पर्यन्त उत्तीर्ण झालेले नाहीत अथवा नियमानुसार सूट मिळण्यास पात्र नाहीत अशांनाही त्यांच्या दिनांक ३०.१२.८९ व दि.३०१२.९१ नंतरच्या वेतनवाढी देण्यात आलेल्या आहेत असे शासनाच्या निदर्शनास आले आहे. तरी जे अधिकारी/कर्मचारी मराठी भाषा निम्नस्तर व उच्चस्तर परीक्षा विहित मुदतीत उत्तीर्ण झाले नाहीत अथवा विहित नियमानुसार त्यांना परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचे आदेश निर्गमित केलेले नाहीत अशा अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना अनुक्रमे दि.३०.१२.८९ व ३०.१२.९१ नंतरच्या वेतनवाढी दिल्या असल्यास त्यांच्याकडून वेतनवाढीची दिलेली सर्व रक्कम वसूल करण्यात यावी असे आदेश देण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.प.आम्बेरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

जिल्हाधिकारी कार्यालय,
7 JAN 1993
प्र. जि. उ. जि. / जिल्हाधिकारी

प्रति,